शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे साप्ताहिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व  परुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
(खाजगी वितरण)
अंक एप्रिल २०१९
अंक क्र. ३९
Website : www.bhidekul.in
Email : office@bhidekul.in

वर्ष : 48 अंक : 3 कोल्हापूर ता. 20 एप्रिल 2019 किंमत 2 रुपये Reg. No. KLR 136/18-20 Posted in Kolhapur RMS

## १७ वे भिडे कुल संमेलन – सांगली २०१९

सांगली येथे राजमती भवनमध्ये दि. १२ व १३ जानेवारी रोजी भिडे संमेलन दिमाखात संपन्न झाले. उपस्थित भिडे मंडळींकडून दोन्ही दिवसांचे कार्यक्रम, भोजन व निवास व्यवस्था ह्याबद्दल चांगल्या प्रतिक्रिया मिळाल्या.

सांगली येथील श्री. कुमार भिडे हे भिडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष असल्यामुळे त्यांचे अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत एक तरी संमेलन सांगलीमध्ये झाले पाहिजे ह्या ध्यासापोटी सांगलीची स्थानिक भिडे मंडळी श्री. श्यामराव व श्री. रविकाका ह्यांनी सर्वश्री संजय, शैलेश, आनंद, डॉ. सुभाष व इतर कुलबंधू व भगिनींच्या सहकार्याने हे संमेलन यशस्वी केले हे कौतुकास्पद आहे. संमेलन यशस्वी करण्यासाठी भिडे प्रतिष्ठानचे विश्वस्त व कार्यकारिणी सदस्य पूर्णपणे मार्गदर्शन करतात आणि बहुतांशी स्वायत्तता देऊन संमेलनाची आखणी करीत असतात. साधारणपणे ४ ते ५ बैठकांमध्ये संमेलन नियोजन केले जाते. त्यामध्ये प्रामुख्याने भोजन, निवास, सांस्कृतिक कार्यक्रम आणि प्रतिष्ठानचे पुरस्कृत केलेले पुरस्कार, सन्मान इत्यादी आवश्यक बाबींचा समावेश असतो. संमेलन खर्चाचा भार शक्यतो प्रतिष्ठानच्या निधीमधून खर्चिक होणारा नसावा असे सांगितले जाते आणि आत्मविश्वासाचे बळ देऊन संमेलनाची आखणी केली जाते.

सांगली संमेलनाध्यक्ष म्हणून आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या नृत्यांगना डॉ. सुचेता भिडे–चापेकर आणि स्वागताध्यक्ष म्हणून सांगलीचे कारखानदार श्री. चंद्रशेखर भिडे यांनी संमेलनाचे उद्घाटन केले. दीपप्रज्वलन झाल्यानंतर वेदमूर्ती प्रतीक भिडे व त्यांचे सहकाऱ्यांनी शांतिपाठ केला. प्रतिष्ठानची वाटचाल, महिला मनोगत, आम्ही भिडे ह्या ३८ व्या अंकाचे प्रकाशन झाले. ह्या वर्षी प्रथमच लेखन स्पर्धा, प्रतिष्ठानने ऑक्टोबरच्या अंकामध्ये ५ विषय आणि शब्दमर्यादा देऊन घेतल्या. ह्याबद्दलचे विवेचन श्री. दिलीप व श्री. प्रभाकर भिडे यांनी करून लेखन स्पर्धेच्या विजेत्यांची नावे जाहीर केली. नेहमीपेक्षा एक आगळावेगळा प्रश्नोत्तरांचा एक तासाचा कार्यक्रम श्री. अमित व सौ. पूनम भिडे ह्या दाम्पत्याने सादर करून प्रतिष्ठानकडून विजेत्यांना जागेवरच पारितोषिके वितरित केली. इंदौरचे श्री. सुरेंद्र भिडे यांचे सहजयोगावर व्याख्यान झाल्यावर सांगलीच्या सौ. मिताली भिडे यांनी नृत्यकला आणि सौ. वैशाली भिडे यांनी आपल्या सुरेल आवाजात काही गाणी सादर करताना प्रेक्षकांची वाहवा मिळवली. सूत्रसंचालन करणारे श्री. शंतनु भिडे यांनी एलईडी स्क्रिनवर



उजवीकडून स्वागताध्यक्ष श्री. चंद्रशेखर भिडे, श्री. कुमार भिडे, संमेलनाध्यक्षा डॉ. सुचिता भिडे-चापेकर, श्री. दिलीप भिडे व श्री. माधव भिडे

सांगलीमधील प्रसिद्ध जुन्या ब्रिटीशकालीन इमारती, क्रांतिकारक, राजकारणी ह्यांची ओळख करून दिली. संमेलनानजिक असलेल्या भोगी व संक्रांतीचे निमित्त साधून भाकरी, गूळपोळी, चमचमीत भाजी व खिचडी ह्याचा आस्वाद सर्वांनी घेतला.

१३ तारखेला सकाळी ७ वाजता गिरगावचे गायक श्री. सतीश भिडे ह्यांच्या एक तासाच्या भूपाळी पहाट ह्या कार्यक्रमाने सुरुवात झाली. त्यानंतर सर्वांनी नाश्ता व चहा घेतला. दरवर्षीप्रमाणेच कला, उद्योजक, माझी आई, साहस, आदर्श कार्यकर्ता यांसारखे पुरस्कार प्रदान केले गेले. सांगली कारखानदार घरामधील ज्येष्ठ महिला श्रीमती सुमतीकाकू आणि ज्येष्ठ पुरुषोत्तम श्री. वसंतराव व इतर ज्येष्ठांचा सन्मान केला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. कुमार भिडे यांनी भिडे ज्ञातीतील तरुण मुलामुलींना नोकरी, व्यवसायाबद्दल मार्गदर्शन करण्यासाठी एक कार्यक्रम करण्याचा विचार सांगताना वेगळ्या क्षेत्रांचा विचार तरुणांनी करणे ही काळाची गरज आहे असेही नमूद केले. माझ्यासारखा एक कार्यकर्ता प्रतिष्ठानचा अध्यक्ष झाला व माझ्या कार्यकाळात संमेलन सांगलीत व्हावे ह्या जिद्दीने सांगलीतील भिडे मंडळींनी कार्य केले त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो असेही ते म्हणाले. त्याचप्रमाणे स्वागताध्यक्ष श्री. चंद्रशेखर भिडे यांनी सुद्धा उद्बोधक असे मोलाचे शब्द सांगितले. डॉ. सुचेता ताईंनी मात्र भाषण न करता चारुचंद्र भिडे यांनी घेतलेल्या मुलाखतीत त्यांच्या प्रश्नाला समर्पक उत्तरे देऊन उपस्थितांची दाद मिळवली.

(पान २, कॉलम २)

## भिडे कुलबंधू, भगिनी व माहेरवाशिणींना आवाहन

भिडे कुलवृत्ताची तिसरी आवृत्ती सॉफ्टवेअरमध्ये करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत हे आपणांस माहीतच आहे. मागील केलेल्या आवाहनाला भिडे मंडळींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यामुळे पहिल्या टप्प्यातील सुमारे ७५० पाने आपण वेळेअगोदरच पूर्ण केली. आता आपल्याला दुसऱ्या टप्प्यामध्ये आपण केलेल्या कामांची तपासणी करावयाची आहे म्हणजे मागील कुलवृत्ताप्रमाणे ही नावे, वंश, शाखा इत्यादी बाबी पुन्हा एकदा पडताळून पाहणार आहोत. शक्यतो बिनचूकपणा असावा आणि चुकीचे नाव, शाखा जोडले जाऊ नये ही अपेक्षा. ह्या संबंधी मार्गदर्शन व सूचना श्री. शंतनु निळकंठ भिडे, पुणे हे देतीलच. कृपया इच्छुकांनी संपर्क करावा ही विनंती. आपल्या सहकार्याशिवाय हे काम पूर्णत्वास येणार नाही. माझ्या माहितीनुसार वरील काम पूर्ण झाल्यावर आपण भिडे मंडळींकडून माहिती मागवून कुलवृत्तासाठी डेटा तयार करणार आहोत. त्यानुसार लवकरात लवकर हे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

संपर्कासाठी – श्री. शंतनु निळकंठ भिडे, पुणे – ७५८८३२१२८९.
ई–मेल : shantubhide@gmail.com – दिलीप भिडे, पुणे (विश्वस्त/सचिव)

आम्ही भिडे अंक ३९ वा

संपादक : श्री. शशिकुमार केशव भिडे
कार्यकारी संपादक : ले. क. सुनिल भिडे
संपादक मंडळ : श्री. दिलीप भिडे, श्री. प्रभाकर भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. प्रदीप ज. भिडे, श्री. विनायक भिडे, सौ. प्रिती भिडे, सौ. संपदा भिडे
सल्लागार मंडळ : श्री. सुनिल भिडे (अभिरूची) पुणे, के. मो. भिडे, श्रीमती शशिताई घुले, श्रीमती सुमती वा. भिडे, पुणे, डॉ. प्रतिभा भिडे, ठाणे
अक्षर जुळणी : सौ. विनीता डबीर

### नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

९२, शुक्रवार पेठ येथील कार्यालय तात्पुरते बंद आहे. त्याठिकाणी पत्रव्यवहार करु नये. त्या ऐवजी पत्रव्यवहारासाठी पत्ता या ठिकाणी संपर्क/पत्रव्यवहार करावा, ही नम्र विनंती आहे.

पत्रव्यवहारासाठी पत्ता
**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**
१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए–२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०
मो. ९६२३०१७४४४

**सर्व जाहिरातदार, बॅनर्सदार, देणगीदार, आश्रयदाते व हितचिंतकांचे प्रतिष्ठान मनःपूर्वक आभारी आहे !**

## पान १ वरून पुढे ...

एवढेच नाही तर भरतनाट्यम ह्या शैलीमधील एक झलक म्हणून ५ ते १० मिनिटांचा कार्यक्रम रंगमंचावर सादर केला हे विशेष कौतुकास्पद आहे. आजमितीला वयाच्या ७० व्या वर्षी सुद्धा त्यांचे पदलालित्या–मध्ये किती कौशल्य आणि चपळता आहे हेही दाखवून दिले. ह्या संमेलनामध्ये मनोरंजन म्हणून जसे वेगवेगळे खेळ, एलईडी स्क्रिनवर संमेलन स्थळांची माहिती, इत्यादी आकर्षक कार्यक्रमांबरोबरच पनवेल येथील एक बंधू ॲड. मंदार भिडे व त्यांच्या भगिनी सौ. राधिका भिडे–जोगळेकर ह्या दोन भावंडांनी त्यांच्या कलाकार सहकाऱ्यांबरोबर सुरेल गाणी सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. ॲड. मंदार भिडे हे दूरदर्शन कलाकार असून भिडे प्रतिष्ठानचे संस्थापक व विश्वस्त कै. ॲड. विश्वासराव भिडे यांचे चिरंजीव आहेत. दुपारच्या भोजनामध्ये दोन पक्वान्ने, ड्रॅगन रोल, यासारखे विविध चविष्ट पदार्थ देऊन विशेष लज्जत आणली. शेवटच्या सत्रात दोन तासांच्या चर्चेमध्ये पनवेल आणि डोंबिवली येथील श्री. मंदार भिडे ह्या दोघांनी पुढील संमेलन पनवेल येथे घेण्यासाठी निश्चिती केली. त्याप्रमाणे प्रतिष्ठानकडून वेळोवेळी बैठका घेऊन २०२० चे नियोजन केले जाईल. खुली चर्चा ह्या कार्यक्रमामध्ये सोलापूर येथील महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. जयराम भिडे व प्राध्यापिका श्रीमती प्रतिभाताई भिडे यांनी युवापिढीसाठी मार्गदर्शन करण्याची तयारी दाखवली. तसेच कर्नल दामोदर भिडे यांनी एक संमेलन विदर्भात घ्यावे असे सुचविले. ॲड. सौ. अलका भिडे, श्री. प्रभाकरपंत भिडे, सौ. संपदा, श्री. शंतनु व आयोजकांपैकी श्री. श्यामराव भिडे यांनी मौलिक सूचना करून मार्गदर्शन केले. सांगलीच्या आयोजकांची कृतज्ञता ले.क. सुनिल भिडे यांनी व्यक्त केली. त्यानंतर सामुहिक पसायदान झाल्यानंतर चहापानाचा कार्यक्रम होऊन संमेलनाची सांगता झाली. ह्या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. माधवी व श्री. शंतनु भिडे यांनी केले. श्री. संजय भिडे, सांगली यांनी संमेलनामध्ये जाहिरात व प्रसिद्धी विभाग सांभाळला. त्यामुळे भिडे प्रतिष्ठानच्या इतिहासात भिडे संमेलनाची बातमी, फोटोसह सांगलीच्या वृत्तपत्रांमध्ये झळकली हे विशेष नमूद करावेसे वाटते.

दरवर्षी प्रत्येक भिडे कुलसंमेलनामध्ये महाराष्ट्र चित्पावन संघ पुणे यांचेकडून सुमारे १५० ते २०० दिनदर्शिका दिल्या जातात. ह्या वर्षी सुद्धा संस्थेचे कार्यवाह श्री. अजितराव भिडे व अशोकराव वझे यांनी दरवर्षीप्रमाणेच सहकार्य केले. त्यासाठी चित्पावन संस्थेचे भिडे प्रतिष्ठान आभारी आहे.

– दिलीप वासुदेव भिडे, पुणे.
मो. ९६५७५४१२३६

**सहवेदना :** भिडे कुलातील निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात कुलबंधु, भगिनी आणि माहेरवाशिणींना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे.
१) श्रीमती कमल कृष्ण भिडे, बेळगांव.
२) श्री. दत्तात्रय पुरुषोत्तम भिडे, सातारा.
३) डॉ. चारुचंद्र भालचंद्र भिडे, सांगली.

## व्यक्तिगत आर्थिक स्थैयाचा निकष संस्थेच्या प्रगतीसाठी तितकाच आवश्यक असतो. संस्था आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हावी व सर्व सदस्यांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साधावे ह्या हेतूने नित्युंदय गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त किमान एकदा देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा !

### भिडे कुलप्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

**एप्रिल**

१. श्री. सुहास दत्तात्रय भिडे, सातारा १
२. सौ. सुनंदा वसंत भिडे, पुणे १
३. श्री. महेश मधुसुदन भिडे, अलिबाग २
४. सौ. पूर्वा प्रमोद देवधर, दादर २
५. श्रीधर रामचंद्र भिडे, चिपळूण २
६. सौ. अलका केशव भिडे, पुणे ६
७. श्री. पुष्कर प्रसन्न भिडे, पुणे ६
८. श्री. अभिषेक सुरेंद्र भिडे, इंदौर १०
९. सौ. पौर्णिमा धनंजय भिड, पुणे १३
१०. कु. भूषण गजानन भिडे, अलिबाग १५
११. श्री. केशव मोरेश्वर भिडे, पुणे १६
१२. श्री. रमेश रामचंद्र भिडे, डोंबिवली १७
१३. श्री. संजय शंकर भिडे, मुंबई १७
१४. श्री. संतोष वसंत भिडे, ठाणे १८
१५. श्री. अरविंद श्रीपाद भिडे, पुणे २०
१६. ॲड. अविनाश ज. भिडे, नाशिक २१
१७. सौ. मधुरा श्रीकांत भिडे, रोहा २३
१८. श्री. विनायक सदाशिव भिडे, धुळे २४
१९. चि. अथर्व विवेक भिडे, रत्नागिरी २४
२०. श्री. धनंजय केशव भिडे, पुणे २४
२१. ॲड. अविनाश ज. भिडे, नाशिक २४
२२. सौ. शर्मिला नितीन पुराणिक, पुणे २५
२३. श्री. भास्कर प्रभाकर भिडे, पुणे २६
२४. श्री. यशवंत रामचंद्र भिडे, कांदिवली २७
२५. कु. अक्षत विवेक भिडे, दिल्ली २८
२६. कु. अक्षन विवेक भिडे, दिल्ली २८
२७. सौ. कीर्ति प्रशांत भिडे, पुणे २८
२८. सौ. मृणाल प्रकाश भिडे, माभळे २९

**मे**

१. श्री. अरविंद नरहरी भिडे, पुणे ३
२. सौ. वृषाली विठ्ठल भिडे, डोंबिवली ३
३. सौ. शुभांगी वामन भिडे, पुणे ५
४. सौ. स्नेहा नितीन भिडे, पुणे ५
५. श्री. आशिष अनिल भिडे, भोपाळ ६
६. कु. प्रचिती प्रसदा भिडे, पुणे ७
७. सौ. मिताली मंदार भिडे, रत्नागिरी ९
८. कु. मृण्मय मंदार भिडे, रत्नागिरी १०
९. श्री. शरद हरी भिडे, पुणे ११
१०. श्री. राजेश शरद भिडे, पुणे ११
११. सौ. कल्याणी विनोद भिडे, औरंगाबद ११
१२. श्री. विश्वनाथ शंकर भिडे, बदलापूर १३
१३. सौ. पूनम अमित भिडे, पुणे १३
१४. कु. मैत्रेयी सुहास भिडे, पुणे १३
१५. श्री. यज्ञेश्वर भालचंद्र भिडे, पुणे १७
१६. सौ. अर्चना अशोक भिडे, पनवेल १९
१७. श्री. मंदार उदय भिडे, देवरुख १९
१८. सौ. माया सुनिल भिडे, पुणे १९
१९. सौ. उज्वला यशवंत भिडे, औरंगाबाद १९
२०. कु. ईशान अभित भिडे २१
२१. श्री. सुभाषचंद्र नरहर भिडे, पुणे २२
२२. कु. सदिच्छा सतीश भिडे, मुंबई २३
२३. कु. ओम चंदन भिडे, पुणे २४
२४. सौ. अभिलाषा रोहन भिडे २४
२५. सौ. रेखा प्रकाश भिडे, डोंबिवली २५
२६. श्री. अजय बाळकृष्ण भिडे, पुणे २६
२७. कु. रिचा विक्रम भिडे, हैद्राबाद २६
२८. कु. अपूर्व राजेंद्र भिडे, डोंबिवली २७
२९. सौ. मंगला प्रदीप कुलकर्णी, भांडुप २७
३०. चि. भार्गवी विक्रांत भिडे, पुणे २८
३१. श्री. संजय प्रभाकर भिडे, माणगांव २९
३२. सौ. अनुराधा चंद्रकांत भिडे, पुणे २९
३३. श्री. प्रवीण प्रभाकर भिडे, पुणे २९
३४. श्री. विनयकुमार भिडे, बेंगलोर २९
३५. श्री. विजयसिंह विष्णू भिडे, नाशिक ३१

**जून**

१. सौ. वर्षा दिलीप भिडे, पुणे १
२. सौ. उर्मिला अरविंद भिडे, पुणे १
३. अमोल मुकुंद भिडे, सांगली २
४. कु. अमृता चंदन भिडे, पुणे ५
५. सौ. प्रिया सुनील भिडे, पुणे ६
६. सौ. सुनीता विजय भिडे, ठाणे ८
७. सौ. आदिती अविनाश भिडे, नाशिक ९
८. सौ. कीर्ती नरेंद्र देव, पुणे ९
९. सौ. रश्मी अमेय भिडे, पुणे १२
१०. श्री. कुमार विष्णू भिडे, पुणे १२
११. सौ. गार्गी आदित्य जोशी, पनवेल १३
१२. श्रीमती कमल बाळकृष्ण देवधर, गिरगांव १४
१३. श्री. आल्हाद प्रमोद भिडे, पुणे १५
१४. डॉ. माधुरी प्रसाद भिडे, पुणे १७
१५. सौ. संगिता सतिश भिडे, नाशिक १८
१६. कु. अश्विनी विजय भिडे, ठाणे १९
१७. सौ. मधुमती चिंतामण भिडे, पुणे २०
१८. श्री. श्रीनिवास केशव भिडे, बेळगांव २०
१९. सौ. सुनीती विवेक भागवत, नाशिक २१
२०. श्री. प्रभाकर नारायण भिडे, माभळे २१
२१. क्षितीजा गणेश भिडे, पुणे २१
२२. सौ. मोहिनी अविनाश भिडे, पुणे २३
२३. सौ. नीला कुमार भिडे, पुणे २३
२४. श्री. प्रतीक संतोष भिडे, ठाणे २६
२५. श्री. विजय रघुनाथ भिडे, ठाणे २८
२६. श्री. उमेश अशोक भिडे, पनवेल २९
२७. सौ. माधवी धनंजय भिडे, खालापूर २९
२८. नीलकमल फडके, पुणे २९

लेखन स्पर्धा -
उत्तेजनार्थ पारितोषिक

# अमरनाथ यात्रा
## (एक दैव योग यात्रा)

सौ. वैशाली शाम भिडे
'मधुरंग' प्लॉट नं. १७, गव्हर्नमेंट कॉलनी,
विश्रामबाग, सांगली - ४१६ ४१५.

आम्हा उभयतांची बारा ज्योतिर्लिंगे पूर्ण झाली आहेत. रामेश्वरचा सेतू गंगेत अर्पण केला व काशीची गंगाही रामेश्वरला वाहिली. माणसाचे कसे असते की एखाद्या गोष्टीची चटक लागली की गप्प बसवतच नाही. सहा महिने झाले की आम्हाला ट्रिपची आठवण होते व ट्रीपला गेल्याशिवाय राहवतच नाही. त्यातच वर्तमानपत्रात, टी.व्ही. वर अमरनाथ यात्रेच्या जाहिराती दाखवत असल्याने, मागील कटू आठवणी जाग्या झाल्या. कारण खास अमरनाथ यात्रेसाठी सांगलीहून यात्रा कंपनीबरोबर आम्ही जायचे ठरविले होते. पण त्या प्रवासास सुरुवातीपासूनच नाट लागला होता. त्यावेळी अमरनाथ दर्शन आमच्याच काय सहलीमधील कोणाच्याच नशिबात नव्हते. आता अमरनाथ यात्रा करायचीच असा चंगच बांधला व त्या दृष्टिकोनातून आम्ही तयारी सुरू केली. या वेळेस आम्ही दोघांनीच जायचे निश्चित केले. आम्ही तिसऱ्यांदा काश्मीरला जात असल्याने श्रीनगर, जम्मू यांची चांगली माहिती झाली होती. हॉटेल्सची पण माहिती होतीच. त्यामुळे कसलीच काळजी नव्हती.

जायचे ठरविल्यानंतर पहिले काम म्हणजे शारीरिक स्वस्थता तपासणी करणे आवश्यक होते. कारण त्यावरच परवानगी दिली जाते. मागील अनुभवावरून या वेळीही आम्ही तालुका रुग्णालयात तपासणी करिता गेलो. या वेळी फक्त आम्ही दोघे एवढाच काय तो फरक. माझे एचबी ९ एवढे कमी होते. त्यामुळे जरा भीती वाटत होती. यांच्या प्रकृतीबाबत काहीच प्रश्न नव्हता. पण झाले उलटेच. मी मात्र एकदम फिट व हे मात्र अनफिट. यांना ईसीजी टेस्ट करावी लागली. त्यात निघाले काहीच नाही. अशा रितीने शारीरिक स्वस्थतेचा गड एकदाचा जिंकला. आता दुसरे म्हणजे बालटाल येथे लागणाऱ्या गेटपासची व्यवस्था करायची होती. ती व्यवस्था पंजाब नॅशनल बँकेमधून करण्याची खास यात्रा कालावधीसाठी सोय केली होती. तिथे मात्र आमची स्वास्थ्य प्रमाणपत्रे पाहून त्यांनी लगेचच गेटपासेसची पूर्तता केली.

आम्ही सर्व गोष्टींचा विचार करूनच यात्रेची तारीख ठरविली होती. पहिली बॅच २२ जून २०१८ रोजी रवाना होणार होती. म्हणून आम्ही सात जुलै निश्चित केली व कामाला लागलो.

आम्ही ऑनलाईन विमानाची तिकीटे बुक केली. विमानाने जाण्याचे निश्चित केल्यामुळे ६ जुलै १८ रोजी महालक्ष्मी एक्सप्रेसने मुंबईला रवाना झालो. आतापासून आमची खऱ्या अर्थाने ट्रीप सुरू झाली होती. आम्ही ७ जुलै १८ ला दादरला पोचलो त्यावेळी सकाळचे ७ वाजले होते. आमचे विमान सुटण्याची वेळ ११ वाजताची होती. आम्ही विमानतळावर टॅक्सीने गेलो व येथूनच आमच्या यशस्वी प्रवासाची नांदी सुरू झाली. आमचा टॅक्सी ड्रायव्हर असू नये एवढा चांगला होता. त्याने आमच्याशी खूप छान गप्पा मारल्या. त्याला आम्ही घरचे भेटल्यासारखे वाटलो. विमानतळावर येताच तो यांना 'थांबा काका !' म्हणून ट्रॉली मुख्य गेटपर्यंत आमचे सामान ढकलत आणण्यापर्यंत मदत केली. त्याने शुभेच्छा देऊन आमचा निरोप घेतला. मुंबईच्या टॅक्सीवाल्यांच्या बिलंदरपणाच्या कथा ऐकून होतो. पण हा काही वेगळाच होता. जाता जाता आनंद देऊन गेला. हे इंडिगो कंपनीचे विमान खूपच मोठे होते.



विमानतळावर आत आल्यानंतर लांबच्या लांब कॉरिडॉर आणि मोहोळ फुटावे तसे हवाई सुंदऱ्यांचे थवेच्या थवे आपल्या बॅगा ओढत ड्युटीवर निघाल्या होत्या. कमनीय बांधाच्या आणि आपापल्या कंपन्यांचे वेगवेगळ्या रंगाचे युनिफॉर्म घातलेल्या. सर्वजणच त्यांच्याकडेच पाहत होतो. आम्ही रेल्वेतून डायरेक्ट विमानतळावर आल्यामुळे फ्रेश झालो नव्हतो. तोंड वगैरे धुवून बाहेर मिळणारा पंधरा रुपयांचा चहा पन्नास रुपये कपाप्रमाणे दोन कप घेतला. मग इंडिगो कंपनीच्या काऊंटरवर गेलो. कागदपत्रांची तपासणी करून तिकीटे व सीटनंबर वगैरे दिले. विमानतळ अगदी स्वच्छ आणि नेटका होता. शेवटी एकदाची सूचना झाली. गेट नं. ११ मधून आम्ही आत शिरलो. रीतसर बॅगांची तपासणी झाली. विमान तयार होते. विमानात प्रवेश केल्या केल्या छानशा हवाईसुंदरीने कमरेत किंचित वाकून व कमावलेले हास्य करून आमचे स्वागत केले. एवढ्या मोठ्या विमानात बसण्याचा योग आला नव्हता. जवळ जवळ १८० उतारूंचे विमान आमच्या दृष्टीने प्रचंडच होते. विमान प्रवासही चार-पाच तासांचा होता. त्यामुळे 'एक्साईटमेंट'ही फार होती. विमान घरघरू लागले. आम्हाला जागा खिडकीजवळ मिळाल्या नव्हत्या. त्या जम्मूला मिळणार होत्या. एवढ्यात 'कुर्सीकी पेटी बांधो'ची सूचना हिंदी व इंग्रजीमधून झाली. ती पेटी कशी बांधायची यासाठी इकडे-तिकडे पाहत होतो. आणखीही बरेच लोक होते. खटपटीअंती ती पेटी एकदाची पोटाभोवती आवळण्यात यश आले. आता विमानाने मोठा आवाज करत वेग घेतला. दोन-तीन किलोमीटर अंतर धावले व एकदम आकाशात झेपावले. उंचीवर गेल्यावर मात्र स्थिरपणे उडू लागले.

आता जरा स्थिरस्थावर झाले होते. प्रत्येकजण आपला शेजारी कोण आहे बघू लागले. एवढ्यात आमच्या पलीकडच्या बाजूच्या सीटस्वर बहुतेक गुजराथी असावेत. सात-आठजण होते. सकाळच्या गडबडीत बहुधा बिचारे न जेवताच आले असावेत. त्या गुजराथ्यांनी विमानाला एस.टी.ची कळा आणली होती. त्यांच्या एकूण वागणुकीवरून ते सराईत विमानप्रवासी असल्याचे जाणवत होते. त्यामुळे फरसाण, ढोकळा, खाकरे यांसारख्या पदार्थांचा समाचार घेत होते. तीन-चार लायनीत बसल्यामुळे बिचाऱ्या गृहिणीला इथेही डबे हातात घेऊन वाढण्याचे काम करावे लागत होते. हे दृश्य दृष्टिपथात येणारे सर्व मागचे पुढचे प्रवासी त्यांच्याकडेच बघत होते. वाटताना सांडत होते. स्वच्छ भारताची जाऊ दे, स्वच्छ विमानाची त्यांनी ऐशी तैशी केली. भारतीयतत्त्वाचा असाही एक अनुभव.

एवढ्यात आणखी एक 'अनौन्समेंट' झाली. आणीबाणीच्या वेळी काय काय करावे याची प्रात्यक्षिके सुरू झाली. विमानाची लांबी खूप मोठी असल्याने समोर एक, मधल्या पॅसेजमधे अंतरा-अंतरावर तीन सुंदऱ्या

ध्वनिमुद्रित केलेल्या सूचनांबर हुकूम भरतनाट्यमच्या मुद्रा केल्यासारख्या प्रात्यक्षिके करून दाखवत होत्या. विमानात काही कारणाने ऑक्सिजन कमी झाला तर काय करावे, मळमळल्यास काय करावे यांच्या तोंडी सूचनांप्रमाणे ॲक्शन करून दाखविल्या. प्रवास सुरू होऊन आता तास-दीडतास होऊन गेला होता. खानपानाच्या ट्रॉलीज घेऊन मधल्या पॅसेजमध्ये सुंदरी आल्या. बरेचजण काही बाही घेत होते. विमानातला चहा असतो तरी कसा हे पाहण्यासाठी दोन कप चहा व एक बिस्किटचा डबा घेतला. बाकी काहीही म्हणा या हवाई सुंदरींना कामे मात्र भरपूरच होती. प्रवाशांना मदत, कोणी पाणी मागतेय तर आणखी काही. आमचे विमान तीनच्या सुमारास जम्मूला पोचले. बरेच लोक उतरले. आता आमची सीट बदलली. खिडकीपाशी जागा मिळाली. त्यामुळे मी विमानातून खूप फोटो काढले. आम्ही निघताना झेलम, जम्मूतावी नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत असल्याच्या बातम्या टी.व्ही.वर दाखवत होत्या. पण मी काढलेल्या फोटोत तसे काहीच दिसत नव्हते. विमान अर्धातास थांबणार होते. मग श्रीनगरसाठी उड्डाण करणार होते. आम्ही साधारण ४ च्या सुमारास श्रीनगरला पोचलो. बाहेर ही गर्दी. शेवटी रिक्षा करून झीरो ब्रीज राजबाग श्रीनगर येथे 'हॉटेल हेवन'मध्ये ४.३० वाजता पोचलो. हॉटेलचा मालक शोयब हा आमचा मित्रच झाला होता. त्याला आधी कळवले होते. त्याने आमच्यासाठी झेलमनदीच्या बाजूची मस्त खोली राखून ठेवली होती. खरे तर खूप भूक लागली होती. आंघोळी करून ताजेतवाने झाल्यावर बॅगेतील शिदोरी काढली. मस्त ताव मारला. शोयबने थर्मास भरून पाठविलेल्या चहाचा मनसोक्त आस्वाद घेतला. आम्ही तिसऱ्यांदा काश्मीरला आलो असल्याने याच हॉटेलात राहिल्यामुळे शोयबशी चांगली जानपहचान झाली होती. फोनवरून संपर्कही करत होतो. त्यामुळे कसलीच अडचण आली नाही. श्रीनगरही चांगले ओळखीचे झाले होते. जुलैमध्ये काश्मीरमध्ये प्रचंड ऊन होते. दिवसही आठपर्यंत मावळत नसे. वेळ भरपूर असल्याने आम्ही श्राईन बोर्डाच्या ऑफिसमध्ये जायचे ठरवले. जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यांच्या यात्रा कालावधीत रात्रंदिवस उघडेच असते. यात्रेकरूंच्या सेवासुविधांकडे जातीने लक्ष दिले जाते. आम्ही संध्याकाळी ६.३० वाजता ऑफिसमध्ये पोचलो. तेथे एक अधिकारी व एक कारकून होते. (फसलेल्या यात्रेच्या वेळी घेतलेले अमरनाथ यात्रेवरील एक पुस्तक घेतले होते. त्यात अनेक उपयुक्त फोन नंबर होते. त्यात लालबाग चौक येथील सरबजीतसिंग यांचा फोन नंबर होता. त्यांना मी सांगलीहून फोन केला होता. त्यांनी अत्यंत आस्थेने माझ्या प्रश्नांची उत्तरे दिली व काहीही अडचण आली, अगदी राहण्याची सुद्धा तर माझ्या हवेलीत मी तुमची सोय करीन असे आश्वासन दिले.) योगायोगाने श्राईन बोर्डातील त्या अधिकाऱ्याचेही तेच नाव होते. त्याने बालटाल ते अमरनाथ गुहेपर्यंत जाणाऱ्या पालख्या, घोडे वगैरेचे दर पत्रक दिले. माझ्या फोन केल्याचा परिणाम म्हणा किंवा आणखी काही त्याने त्या दरपत्रकावर बालटालच्या अधिकाऱ्यांना आमची राहण्याजेवण्याची सोय करण्याचे आदेश दिले व यांची गैरसोय होता कामा नये असेही नमूद केले. स्वतःचा फोन नंबरही दिला. पण त्याने हेलिकॉप्टरचा विषय माझ्या अखत्यारीतला नसल्याने मी याबाबतीत मदत करू शकणार नाही. पण उद्या सर्व ऑफिस उघडेल व याच कार्यालयात हेलिकॉप्टरचा विभाग आहे तेव्हा प्रयत्न करायला हरकत नाही असे सांगून त्याने आमचा निरोप घेतला.

मी पाहिले आहे की काश्मीरात शिख व पंजाबी लोक अगत्यशील आहेत व सतत मदतीसाठी तत्पर असतात. अगदी काश्मीरी मुसलमानदेखील यात्रेकरूंना मदत करण्यास सदैव तयार असतात. मागच्या ट्रीपला आम्ही सेंटार हॉटेलमध्ये हेलिकॉप्टरच्या तिकीटासाठी गेलो होतो. काम करून रस्त्यावर येऊन वाहनाची वाट पाहत उभे होतो. एवढ्यात एक गाडी आमच्या जवळ येऊन थांबली. त्यांनी विचारले की तुम्हाला कुठे जायचे आहे ? गाडीत पतीपत्नी दोघेच होते. क्षणभर काय करावे कळले नाही. आमचा संभ्रम पाहून ते म्हणाले, आप डरिये मत। आप हमारे मेहमान हो और मेहमान भगवान का रूप होता है। आम्ही निःशंक मनाने गाडीत बसलो व निषादगार्डनपर्यंत त्यांनी आम्हाला सोडले. कारण इतर सर्वजण तिथे होते.

आम्ही हेवन हॉटेलमध्ये परतलो तर तेथे शोयबचे वडील श्री. हमीदभाई टी.व्ही. बघत बसले होते. त्यांनी आमची विचारपूस केली व आम्हाला सल्ला दिला की उद्या शोयब रजा काढेल व तुमच्याबरोबर गव्हर्नर हाऊसमध्ये येईल व तिथे तुम्हाला सर्व माहिती मिळेल. त्यांच्या आग्रहाखातर शोयबच्या गाडीतून गव्हर्नर हाऊसमध्ये गेलो. चौकीदाराने अडवल्याने आम्ही रस्त्यातच थांबलो होतो. एवढ्यात हाऊसमधून दोन-तीन गाड्या आल्या. आम्हाला पाहताच थांबल्या. थांबल्याच नाहीत तर गाडीतून उतरून आमची चौकशी केली. अगदी आस्थेने. त्या वेळीही म्हणजे जुलै १८ मध्येही श्री. मलिकच राज्यपाल होते. गाडीतल्या अनोळखी अधिकाऱ्यांनी आमची अडचण समजून घेतली व राज्यपालांच्या स्वीयसहायकाचा फोन नंबर दिला.जाता जाता एक 'क्लू'ही दिला. कोणी व्हीआयपी ओळखीचे असतील तर तुमचे काम नक्कीच होऊन जाईल. तुम्ही श्राईन बोर्ड ऑफिसमध्ये जाऊन चौकशी करा. बोर्डाच्या कार्यालयात आमचे चहा वगैरे देऊन स्वागत केले. पण आमचे काम ऐकताच जागा शिल्लक नाहीत वगैरे पाढा वाचला. आम्ही दोघेच आहोत, महाराष्ट्रातून आलोय. पण दुर्लक्ष करून येथून जावे असे दर्शविले. आम्हाला 'क्लू'ची आठवण झाली. आम्ही वेळ न दवडता यांचे मित्र श्री. सुधीरदादा गाडगीळ व विद्यामन आमदार यांचा फोन लावला व त्यांना अडचण सांगितली. राज्यपालांच्या पीएंचा फोन नंबर त्यांनी दिला. दादांनीही वेळ न दवडता फोन लावला तसेच त्यांनी मेसेज केला. तो मात्र पीएसाहेबांनी लगेच पाहिला व त्यांनीही तो मेसेज श्राईन बोर्डात कळवून दोन तिकिटे देण्याबाबत आदेश दिले. आम्ही जिना उतरत असताना एक अधिकारी आम्हाला सांगत आला की, आपका काम हो गया। हम आपको हेलिकॉप्टर का ऑर्डर दे रहे है। आनंदाने वय विसरून टुणकन उडी मारली. महत्त्वाचे व अत्यावश्यक काम केवळ दादांमुळेच झाले होते. या यात्रेमध्ये खरच दैव फार जोरावर होते. याचा अनुभव पुढेही यायचा होता. म्हणूनच अमरनाथ यात्रा एक दैवयोग यात्रा असे मला वाटते. आम्हाला तर दर्शन घ्यायचेच होते. पण अमरनाथांनाही बहुतेक आमचे येणे हवेच होते. ट्रीपच्या पूर्ण कालावधीत हे जाणवत होते. आमचा गेटपास १० तारखेचा म्हणजे मंगळवारचा होता. पण श्राईन बोर्डाने आम्हाला सोमवारचे तिकीट दिले. या योगाला काय म्हणायचे ? असो.

आज रविवार असल्याने आम्हाला आजच निघणे गरजेचे होते. म्हणून आम्ही लगेचच हॉटेलमध्ये आलो. शोयब बरोबर होताच. त्याने आम्हाला त्याचा हिलाल नावाचा मित्र व त्याची टॅक्सीही होती त्याला फोन करून बोलावले. तो आला पण तो बालटालला यायला तयार नव्हता. कारण त्या

रस्त्यावर चेकपोस्ट फार असल्याने त्रास अशी त्याची कुरकुर चालू होती. मी त्याला म्हटले की एवढी कामे झालीत तर हेही होईल. आपल्याला कोणताही त्रास होणार नाही असे माझे मन मला सांगते आहे. शेवटी हो-ना करता यायला तयार झाला. बालटालचे पहिले चेकपोस्ट तर विनाकटकट पार पडले. बघता बघता दुसरेही पार पडले. हिलाल मात्र आता अस्वस्थ दिसायला लागला होता. शेवटचे चेक पोस्ट मनीगम येथे आहे. पोलिसांची वाहनांवर ससाण्यासारखी नजर असते. महत्त्वाचे म्हणजे त्या दिवशी काही कारणाने श्रीनगर बंद होते. पण यात्रेकरूंना त्या बंदचा त्रास श्रीनगरमध्ये नव्हता. कदाचित आमचा बलवत्तर योग म्हणा किंवा अमरनाथांची कृपा म्हणा आम्ही चेकपोस्टपाशी आलो तर एकही पोलीस बाहेर चेकिंगसाठी नव्हता. त्यामुळे वेगाने चेकपोस्ट पार करून एक दोन कि.मी. अंतरावर हिलालने गाडी बंद केली व जोरजोरात आनंदाने गायला लागला व मला मम्मी व यांना पापा म्हणून मम्मी-पापा हम जीत गये। अब आपको बर्फानी बाबाके दर्शन लेने से कोई रोक नहीं सकता। आम्हाला खूप आनंद झाला. त्यानंतर मात्र हिलाल अखंड बडबडत होता. त्याला काश्मीर स्वतंत्र देश म्हणून हवा होता. हेच सर्व काश्मीरी लोकांचे मत होते. त्यांच्या भावना तो व्यक्त करीत होता.

माझी सर्वच देवांवर भक्ती आणि श्रद्धा आहे. पण आवडता देव म्हणजे शंकर महाराज. सोळा सोमवारचे व्रतही मी यशस्वीपणे केले. माझे माहेर हरिपूर. सांगलीहून दोन कि.मी. वर. तिथले ग्रामदैवत म्हणजे कृष्णा-वारणा नद्यांच्या संगमावर असलेले संगमेश्वर मंदिर. श्रीरामांनी वनवासात असताना स्वतःच्या हाताने वाळूची पिंड तयार केल्याची आख्यायिका आहे. त्यामुळे श्रावणात दर सोमवारी यात्रा भरते. संगम असल्याने निसर्गरम्यही तेवढेच आहे. नाटककार गो. ब. देवल, काव्यविहारी नावाने प्रसिद्ध असलेले गद्रे हे कवी याच मातीतले.

बालटालच्या अलीकडे सोनमर्गच्या विरुद्ध बाजूला हेलिकॉप्टरचे स्टेशन आहे. आम्ही तिकीटे काढायला गेलो. त्यांना बोर्डाची ऑर्डर दाखवली. ज्या दिवशीची तिकीटे त्याच दिवशी मिळतील असा नियम असल्याने व तिकीट खिडकी सकाळी सहा वाजता उघडत असल्याचे कळल्याने तिकीटाचा कार्यक्रम रद्द करून बालटालला मुक्कामासाठी जावे असे ठरले. बालटालला जायला निघालो तर पुन्हा एक चमत्कार घडणार होता. आम्ही गाडी सुरू करणार इतक्यात एक माणूस आला व हिलालला म्हणाला मला बालटालला न्याल का ? तेव्हा हिलाल त्याला म्हणाला की यांनी गाडी 'हायर' केली आहे. ते तयार झाले तर तो त्याला सोडेल. आम्ही तिघेच होतो. तो आला तरी चालण्यासारखे होते. आम्ही परवानगी दिली. तोही गप्पा मारू लागला. त्याचे नाव मीर होते. महत्त्वाचे म्हणजे तो बालटालच्या मुख्य गेटवरील अधिकारी होता. सर्व खाजगी वाहने या गेट नं. १ च्या बाहेरच थांबवावी लागतात व प्रवाशांना सामान ओढत त्यांच्या खोल्यांकडे जावे लागते. हे अंतर जवळपास दोन कि.मी. एवढे आहे. परंतु मीर हे आमच्या बरोबर असल्याने आम्ही गाडीसहित आमच्या मुक्कमाच्या ठिकाणी पोचलो. नाहीतर तंगडतोड करावी लागली असती. मीरला श्राईन बोर्डाची ऑर्डर दाखवली. त्याने ताबडतोब आपल्या वरिष्ठांना सांगितले. ते लगेच आले व सर्वात छान कॉटेज आम्हाला दिली. फ्रेश होईपर्यंत चहा आला. रात्री जेवणाचे आमंत्रणही दिले. आमच्याबरोबर जेवायला डी.एस.पी., आय.ए.एस. ऑफिसर होते. तेही आस्थेने विचारपूस करीत होते. खरोखर आम्हाला जी माणसे भेटली त्यांची खूपच मदत झाली व ती अनमोल अशीच होती यात काही संशय नाही.

सोमवारी पहाटे तीन वाजता सांगितल्यानुसार गरम पाणी आणून दिले. अंघोळी व चहा घेऊन बरोबर ३.३० वाजता पहाटे बालटाल सोडले. हेलिकॉप्टर स्टेशनवर बरोबर ४.३० वाजता पोचलो. तेवढ्या पहाटेही लोकांची तिकीटासाठी रांग लागलेलीच होती. शेवटी ६ वाजता तिकीटाची खिडकी उघडली. आम्हाला तिकीटे मिळाली व चौथ्या फेरीतच आमचा नंबर लागला. सकाळी शार्प ७.३० वाजता आम्ही पंचतरणी येथे पोचलो. हेलिपॅडपासून रस्त्यावर येईपर्यंत पालख्या तयारच होत्या. प्रत्येकी ६ हजार रुपये प्रमाणे. पंचतरणी ते अमरनाथ गुहा हे अंतर ६ कि.मी. आहे. रस्ता अत्यंत धोकादायक त्यापेक्षा हवा जास्त धोका देते. त्या डोंगरकडेने काढलेला जेमतेम ५ ते ६ फुटांचा रस्ता. त्यात वरून येणारे झरे. त्यामुळे वाट अगदी निसरडी. या वाटेवरच माझी जवळजवळ वाट लागता लागता वाचली. झाले काय की माझ्या डोलीच्या आडव्या काठीची दोरी अचानक सैल होऊन सुटली. त्यामुळे डोलीवाल्याच्या हातून काठी निसटली. मी एकदम पडणारच होते. पण पुन्हा अमरनाथाची कृपा होऊन डोलीवाल्याने डोली सावरली व मला पडण्यापासून सावरले. नाहीतर चिखलाची अंघोळ झाली असती. शिवाय खाली खोल दरी. पुढचा सर्व रस्ताभर मनात भीती भरून राहिली होती.

डोलीवाले, घोडेवाले प्रवाशांना फारच पिडतात. दर अर्ध्या तासांनी खायला द्या. माताजी कुछ तो खिलाव म्हणून मागतात.आम्ही आमच्याकडील खायचे त्यांनाच दिले. त्यांच्या अशा मागण्यामुळे त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटण्याऐवजी रागच यायला लागतो. मान्य आहे की ते खूप कष्टाचे काम करतात. पण सर्व डोलीवाले एकजात सडपातळ होते. तो भयावह रस्ता संपवून गुहेपर्यंत यायला चार तास लागले. डोल्या पार गुहेच्या पायऱ्यांपर्यंत सोडतात. त्यामुळे भक्तांना २५-३० पायऱ्याच फक्त चढाव्या लागतात. गुहेत सर्वत्र बर्फाचे पाणीच पाणी झाले होते. अनवाणी चालल्यामुळे गारव्याने पाय जवळ जवळ बधीरच झाले होते. पण त्या बर्फाच्या शिवपिंडीकडे पाहून भान हरपले. आपोआप डोळ्यांतून पाणी यायला लागले. ज्यासाठी केला अट्टाहास त्या परब्रह्माचे दर्शन झाले. आम्ही पावन झालो. मला खर तर रुद्राचे आवर्तन करायचे होते. पण तिथल्या ओलाव्याने बसणे शक्यच नव्हते. गुहा प्रचंडच आहे. ६० ते ७० फूट उंच व ३० ते ४० फूट रुंद. गुहेत उजव्या बाजूला अमरनाथांची बारा ते तेरा फुटांची शिवपिंडी. एरवी पंधरा ते २० फुटांपर्यंत मोठी असते. पण यावेळी बर्फ फार पडले नसल्याने एवढी होती. त्यात वातावरणातील उष्म्यामुळे पिंडी वितळत असते. डाव्या कोपऱ्यात पार्वतीमाता व तिच्याजवळ गणेशाच्या बर्फाच्या पिंडी आहेत. निसर्गाचा फार मोठा चमत्कारच आहे.

ज्याचा ध्यास घेतला होता ते शेवटी प्राप्त झाले. डोळेच काय पण सर्व कायाच तृप्तीने भारावून गेली. आमचे आयुष्य कृतकृत्य झाले. एक मात्र कळून चुकले, दर्शन किंवा कुठलीही गोष्ट होणार असली तर तिला कुणीही रोखू शकत नाही. होणार नसेल तर घडवू शकत नाही.

तृप्त मनाने व अतीव समाधानाने पुनःपुन्हा मागे पाहात भिजल्या डोळ्यांत मूर्ती साठवत परतीची वाट धरली. जय अमरनाथजी ! ■

शिशिर ऋतू म्हणजे पूर्णत्वाचा ऋतू. वर्षभर श्रमलेल्या शेतकऱ्यांना सुफल देणारा ऋतू. गर्द पिवळ्या शेतामधून भरभरून देऊन सुकण्याचा, पानगळीचा ऋतू आणि पानगळीनंतर परत लाल-तांबूस कोवळ्या पानांनी धरतीला सुखावणारा सर्व ऋतूंचा राजा म्हणजे वसंत ऋतू. गुढी पाडव्याच्या दिवसाचे आणखीही एक पौराणिक, सांस्कृतिक महत्त्व आहे. रावणाचा वध करून पतिव्रता सीतेला त्या राक्षसाच्या तावडीतून शौर्याची पराकाष्ठा करून श्रीराम-लक्ष्मण सीतेसह अयोध्येत वनवास संपवून परत आले तो हा दिवस म्हणजे गुढीपाडवा. आपल्या महाराष्ट्राचा हा वर्षारंभाचा पहिला दिवस. ह्या दोन्ही कारणांमुळे आपण पाडव्याला गुढी उभी करतो. साऱ्या देशभर ह्या दिवसापासून वसंतोत्सव सुरू होतो. ह्या दिवशी कडुनिंबाला आयुर्वेदाचे दृष्टीने फार महत्त्वाचे स्थान आहे. रोज कटुनिंब, चिंच घालून चटणी करून खावी. अंघोळीच्या पाण्यात घालून अंघोळ करावी. चैत्र शुद्ध तृतीयेस झुल्यावर चैत्रगौर बसवितात. उन्हाळ्याची काहील दूर करण्यासाठी ताज्या कैरीचे पन्हे करतात. चमचमीत अंब्याची डाळ बघितलीच की तोंडाला पाणी सुटते. पुढील कवितेत निसर्गाचे वसंतऋतुतील मनोहारी रूप, निसर्ग हीच चैत्रगौर आहे आणि तिचा वसंतोत्सव सुरू आहे असे चित्र रेखाटले आहे.

## चैत्रगौर

गुढ्या उभारा, लावा तोरण, रेखा रंगावली
गतवर्षा देऊ निरोप, नववर्षाचे स्वागत
चैत्रमास चैत्रगौर चैत्रांगण अंगणात
वृक्षवेली बहरती वसंतोत्सव निसर्गात ॥धृ०॥

बहरली मोगरी निशिगंध गंध उधळी
गुलमोहर लाललाल, कुंकू सांडी धरतीवर
बाभळीही उधळीते धरतीवर हळद फुले
वाऱ्याच्या झुल्यावरी, चैत्रगौर बसूनी झुले
चैत्रमास चैत्रगौर चैत्रांगण अंगणात
वृक्षवेली बहरती वसंतोत्सव निसर्गात ॥१॥

मोहरला आंबा पानोपानी कैरी लगडे
फणसाचा गोडगरा खरबूजे अन कलिंगडे
द्राक्ष घोस लगडती, शहाळ्यातील मधुर साय
चैत्रमास चैत्रगौर चैत्रांगण अंगणात
वृक्षवेली बहरती वसंतोत्सव निसर्गात ॥२॥

निसर्ग गौर देई भरभरून फळे फुले गंध मधुर
ऋण त्याचे फेडाया चैत्रगौर सजवूया
निसर्ग गौर सजलीगे, पूजा तिची करूया
चैत्रमास चैत्रगौर चैत्रांगण अंगणात
वृक्षवेली बहरती वसंतोत्सव निसर्गात ॥३॥

गौरीला हळदकुंकू, शृंगार द्या पन्हे
खोबऱ्याची खिरापत, करंजीची नजाकत
कैरीची डाळ करा ओले हरभरे ओटीला
चैत्रमास चैत्रगौर चैत्रांगण अंगणात
वृक्षवेली बहरती वसंतोत्सव निसर्गात ॥४॥

**- सुमती भिडे,** पुणे ५२.
०२०-२५४४११६१

## आवाहन

**ता. ९ ऑक्टोबर २०११ रोजी पुणे येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभासद वर्गणी मधील रु. १०० चे सर्वसाधारण सभासद वर्ग रद्द केले आहे. त्यामुळे आजीव सभासद रु. १,०००, हितचिंतक रु. ५,०००, आणि आश्रयदाता रु. १०,००० हे तीनच वर्ग ठेवण्यात आलेले आहेत. जे सभासद पूर्वी रु. १०० भरून सभासद झालेले आहेत त्यांनी अधिक रु. ९०० भरून आजीव सभासदत्व घ्यावे. अशा सभासदांना नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान रु. ९०० भरून आजीव सभासदत्व घेण्याची विनंतीपूर्वक आवाहन करीत आहे याची नोंद घ्यावी.**

## माहे जानेवारी ते मार्च २०१९ पर्यंतचे देणगीदार

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. श्रेयस सुभाष भिडे, कल्याण | १,०००/- | आजीव सभासद |
| २) | डॉ. सुचेता भिडे-चापेकर, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| ३) | श्री. दिलीप विश्वनाथ भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| ४) | सौ. रेखा दिलीप भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| ५) | श्री. मदन शरद भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| ६) | सौ. विद्या मदन भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| ७) | श्री. शंतनु श्रीकांत भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| ८) | कु. अश्विनी अशोक भिडे, पुट्टूर, कर्नाटक | १,०००/- | आजीव सभासद |
| ९) | श्री. श्रीपाद नरहर भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| १०) | श्री. प्रदीप जनार्दन भिडे, डोंबिवली | ५००/- | देणगी |
| ११) | श्री. जयंत सदाशिव पाटणकर, कांसे, संगमेश्वर | १००/- | देणगी |
| १२) | श्री. वसंत विष्णु भिडे, सांगली | २०,०००/- | संमेलन देणगी |
| १३) | मे. एम. एम. असोसिएट्स, जयसिंगपूर | १०,०००/- | संमेलन देणगी |
| १४) | श्रीमती शशीताई घुले (भिडे), पुणे | ४,१००/- | संमेलन देणगी |
| १५) | श्री. श्रीपाद नरहर भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |



सांगली : भिडे संमेलनाचे उद्‌घाटन करताना डॉ. सुचेता भिडे.


## सांगलीत भिडे संमेलनामध्ये चर्चासत्र, गुणवंतांचा सत्कार

सांगली : प्रतिनिधी

अखिल भारतीय भिडे संमेलन नुकतेच येथे झाले. आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या प्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना डॉ. सुचेता भिडे -चापेकर यांच्याहस्ते या संमेलनाचे उद्‌घाटन झाले. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष काकासाहेब भिडे, स्वागताध्यक्ष उद्योजक चंद्रशेखर भिडे, प्रतिष्ठानचे सदस्य कर्नल सुनील भिडे, दिलीप भिडे, रवी भिडे, श्याम भिडे, संपदा भिडे आदी उपस्थित होते.

या संमेलनास रत्नागिरी, चिपळूण, कराड, सातारा, सोलापूर, पुणे, मुंबई येथील २५० भिडे बंधू -भगिनी उपस्थित होते. यावेळी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी 'आम्ही भिडे' या त्रैमासिकाचे प्रकाशन करण्यात आले. भिडे कुटुंबातील ज्येष्ठ बंधू- भगिनींचा तसेच शैक्षणिक, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात भरीव कामगिरी केलेल्या भिडे मंडळींचा सन्मान करण्यात आला. आभार संयोजक श्याम भिडे यांनी मानले.

उद्‌घाटन करताना डॉ. सुचेता भिडे-चापेकर, श्री. कुमार भिडे, दिलीप भिडे, माधव भिडे व स्वागताध्यक्ष चंद्रशेखर भिडे



सांगली : भिडे संमेलनाचे उद्‌घाटन करताना डॉ. सुचेता भिडे.

## सांगलीत नित्यूंदन गोत्रीय भिडे संमेलन उत्साहात

सांगली : अखिल भारतीय १७ वे नित्यूंदन गोत्रीय भिडे संमेलन सांगली येथे संपन्न झाले. १२ आणि १३ जानेवारी असे दोन दिवसीय संमेलनाचे उद्‌घाटन आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या प्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना श्रीमती डॉ. सुचेता भिडे चापेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष कुमार काका भिडे, सांगली संमेलन स्वागताध्यक्ष चंद्रशेखर भिडे, प्रतिष्ठानचे सदस्य कर्नल सुनील भिडे, दिलीप भिडे, रवी भिडे, श्याम भिडे आणि प्रतिष्ठानच्या महिला विभागाच्या प्रमुख सौ. संपदा भिडे आदी उपस्थित होते. राजमती भवन, नेमिनाथ नगर येथे संपन्न झालेल्या, या संमेलनाकरिता रत्नागिरी, चिपळूण, कऱ्हाड, सातारा, सोलापूर, पुणे, मुंबई येथील सुमारे अडीचशे भिडे बंधू भगिनी उपस्थित होते. या संमेलना मध्ये प्रतिष्ठानच्या संचालकांबरोबर चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी आम्ही भिडे या त्रैमासिकाचे प्रकाशन करण्यात आले. भिडे कुटुंबातील वयोवृद्ध बंधू-भगिनींचा तसेच शैक्षणिक, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात भरीव कामगिरी केलेल्या भिडे मंडळींचा सन्मान करण्यात आला. आभार प्रदर्शन श्याम भिडे यांनी केले.

सांगलीचे आपले कुलबंधू श्री. संजय भिडे ह्यांनी संमेलनामध्ये जाहिरात व प्रसिद्धी विभाग समर्थपणे सांभाळला. त्यामुळे २०१९ च्या सांगली संमेलनाला भिडे प्रतिष्ठानच्या इतिहासात प्रथमच दै. सकाळ, दै. पुढारी इत्यादी वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्धी मिळाली ही बाब विशेष कौतुकास्पद आहे.

दै. सकाळ : दि. १७ जानेवारी १९
दै. पुढारी : १६ जानेवारी १९

## प्राक्तन

शालिनीताई व माधवराव दोघे देवदर्शनासाठी म्हणून बाहेर पडले. आज त्यांच्या लग्नाचा पन्नास वर्षांचा वाढदिवस होता. संसाराचा गाडा ओढताना कित्येक खाचखळगे येऊन गेले. लाडक्याची प्रकर्शाने आठवण झाली, डोळे पाणावले.

बाहेर पावसाची भुरभुर चालू होती. इतक्यात कोवळे ऊन पडले, दोघे सुखावले. शालिनीताईंच्या ओठी सहज काव्य स्फुरले.

आला श्रावण ! श्रावण ! चिंब भिजून धारांत।
पाठशिवणीचा खेळ आला उन्हासी खेळत॥

सारसनगरीपासून सर्व देव जणू साखळीकरूनच होते. सारसबागेतील विघ्नहर्त्या गणपतीचे दर्शन घेतले. देवळातील सकाळची पहिली आरती मिळाली म्हणून विशेष समाधान झाले. सारसबागेसमोरील तीन देवींचे, दिव्यांच्या झगमगाटात डोळेभरून दर्शन घेतले. नंतर जवळच असलेल्या नवलोबाला गेले. पिंडीपाशी अंधार होता. अर्धी प्रदक्षिणा घालून परत नंदीपाशी आल्या. माधवराव चार पावले पुढेच होते. त्यांचे लक्ष नव्हते. काय मेली एवढी घाई असा विचार शालिनीताईंच्या मनात आलाच नि नेमके त्याचवेळी त्यांचा पाय घसरला. डोळ्यांपुढे अंधेरी आली. पुढचे सारे कळले तेव्हा हात गळ्यात अडकवलेला. त्यांना वाईट वाटले. त्यांच्या मनात आले,

वाढदिवसाच्या दिवशी विघ्नहर्त्याचे आशीर्वाद घेतले
सुवर्णमयी देवीपुढे सौभाग्य मागितले
कैलासराण्याचे दर्शन घेऊन आरोग्यासहित ह्यांना दीर्घायुष्य मागितले
न कळे नक्की माझे काय चुकले
शिवाच्या नंदीनेच तोंडघशी पाडले

– सौ. जयश्री श. भिडे (पुणे) ९८२२०२४८४९

## योगेश्वरीची आरती

धन्य अम्बापुर महिमा विचित्र। पार्वती अवतार योगिनी क्षेत्र।
दन्तासुर मर्दोनि केले चरित्र। सिद्धाचे स्थळ ते महापवित्र॥१॥
जयदेवी जयदेवी जय योगेश्वरी महिमा नकळे तुझा वर्णि ताथोरी॥ध्रु०॥
पतीतपावन सर्वतीर्थ महाद्वारी। माया वेचन सकल माया निवारी।
साधका सिद्धी वाणेंच्या तरी। तेथिल महिमा वर्णु न शके वैखरी॥२॥
सिद्धलिंग स्थळ परम पावन। नृसिंह तीर्थ तेथे नृसिंह वंदन।
मूळपीठी रेणागिरी नांदे आपण। सन्ताचे माहेर मोदे विस्तार॥३॥
महारुद्र जेथे भैरव अवतार। काळभैरव त्याचा महिमा अपार।
नामझरी तीर्थ तीर्थाचे सार। मार्जन करिता दोष होती संहार॥४॥
अनंतरूप शक्तितून योग्य माते। योगेश्वरी नाम त्रिभुवन विख्याते।
व्यापक सकाळां देहि अनन्त क्षणभरिते। निळकंठ ओवाळू कैवल्य माते॥५॥
जयदेवी जयदेवी जय योगेश्वरी महिमा नकळे तुझा वर्णि ताथोरी॥ध्रु०॥

**भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सत्याग्रही स्वातंत्र्यसैनिक कै. रघुनाथ जगन्नाथ भिडे, टेंबवली, देवगड यांच्या गौरवार्थ स्मृती पुरस्कार सोमण-नरवणे कुल संमेलनात नुकताच त्यांच्या सुकन्या सौ. रोहिणी सोमण (भिडे) यांनी स्वीकारला त्याबद्दल अभिनंदन !**



कै. श्री. रघुनाथ जगन्नाथ भिडे यांचा जन्म २ मार्च १९०२ साली मोंड, ता. देवगड, जि. रत्नागिरी (आता सिंधुदुर्ग) येथे झाला. त्यांचे वडील जगन्नाथ यशवंत भिडे प्राथमिक शिक्षक होते. मोंड येथे शेतीवाडी आणि पूर्वीपासून घरात सावकारी होती. सुखवस्तू कुटुंब.

रघुनाथ भिडे यांना दोन मोठे भाऊ, १ बहीण मोठी. हे लहान असल्याने त्यांना बाबू म्हणत. मोठेपणी त्यांना लोक बाबुराव भिडे म्हणू लागले. दुर्दैवाने वडिलांचे छत्र लवकर हरपले. मोठे भाऊ सांगली येथे श्रीमंतांच्या घरी दिवाणजी होते. शिक्षणासाठी बाबुराव सांगली येथे मोठ्या बंधूंकडे राहिले. इंग्रजी सातवीपर्यंत शिक्षण झाले. शाळेत असतानाच त्यांना व्यायामशाळेत जाणे, पोहणे, हजारहजार जोरबैठका काढणे असा छंद होता. प्रवृत्ती धाडसी होती. प्रकृतीही सुदृढ होती.

स्वातंत्र्य चळवळी सुरू होत्या. या सर्व अनुकुल वातावरणामुळे मेळे, घोषणा, इंग्रज सरकार विरोधी भाषणे इत्यादी परिणामांमुळे कोकणातील काही मंडळींच्या प्रेरणेमुळे ते वयाची १८ वर्षे पूर्ण होताच घरची परवानगी न घेताच सेनापती बापटांच्या मुळशी सत्याग्रहात शिरले आणि ते पूर्णपणे स्वातंत्र्यप्राप्तीच्या लाटेत सहभागी झाले. सत्याग्रहातून सुटल्यावर घरच्या मंडळींनी त्यांना पुन्हा कोकणात नेऊन शेतीवाडीमध्ये गुंतविले त्यांचा वयाच्या २५ व्या वर्षी कालवी येथील सरदार मराठ्यांची मुलगी कृष्णाबाई हिच्याशी विवाह झाला. मोंड येथे ते राहत होते पण भाऊबंदकीला कंटाळून १९३४ साली मोंडच्या पलीकडे (मधेखाडी) टेंबवली येथे पत्नीचे सासर माहेरचे दागिने विकून ६ एकर जमीन घेतली. थोडीशी आंब्याची झाडे, माड होते.


पण कट्टर गांधीवादी विचारसरणीने ते कुठेही स्थिर नव्हते. सत्याग्रह, भूमिगत चळवळी, तुरुंगवास, स्वदेशीचा ध्यास, अनेकवेळा तुरुंगवास, १९४७ सालापर्यंत असे अस्थिर, विस्कळीत जीवन. मधून मधून ते घरी असत तेव्हा शेतीवाडीकडे लक्ष देत. पत्नी सौ. भागिरथीबाई भिडे यांनी माहेरच्या मंडळींच्या आधाराने मुलामुलींची शिक्षणे केली.

घरावर बहिष्कार, उपासमार, दारिद्र्य या गोष्टींना सामोरे जावे लागले. पण पती-पत्नींनी नीतिमूल्ये, आतिथ्य हे सर्व जपले होते. मुलांवरही तेच संस्कार केले होते. १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यावर ते गावी शेती करू लागले.

देवगड तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिकांच्या नावाचा एक स्तंभ पंचायत समितीपुढे उभारला गेला. त्यावर त्यांचे नाव कोरले गेले. स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शन मंजूर झाली तेव्हा वसंतराव नाईक हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. श्री. भिडे यांना स्वातंत्र्यसैनिक म्हणून सन्मानपत्र आणि रुपये ५००/- मानधन मिळाले. त्याचा त्यांनी स्वीकार केला पण पेन्शनसाठी मात्र त्यांनी नकार दिला. ते म्हणाले, ‘मी देशसेवा केली ती नोकरी म्हणून नव्हे. ते माझे कर्तव्य होते. मला पेन्शन नको !’ निःस्पृह, निस्वार्थी रघुनाथ भिडे ९ ऑगस्ट १९८८ रोजी स्वतंत्र भारताचा निरोप घेऊन कालवश झाले. त्यांना ६ मुलगे आणि ४ मुली अशी १० मुले आहेत. सर्वजण सामान्य पण सत्प्रवृत्त आहेत.

अशा ह्या स्वातंत्र्य सैनिकाला आमचे प्रणाम !!

## अभिनंदन !



सौरशक्तीवर चालणाऱ्या दिव्यांचे ग्रामीण भागातील गरजू व गरीब मुलांना वाटप करणाऱ्या आयआयटीची बेंगलोर येथील ‘सोल’ ह्या प्रकल्पासाठी सायली चंद्रशेखर भिडे ही काम करते आहे. सुमारे ५० लाख मुलांना ह्या दिव्यांचे वाटप झाले आहे. २ ऑक्टोबर २०१८ रोजी पाच हजार मुलांनी आयआयटीबी, बेंगलोर ह्या संस्थेमध्ये असे दिवे स्वतः बनविले आणि हे सर्व दिवे एकाचवेळी प्रकाशित केले हे कौतुकास्पद आहे. कु. सायलीने औद्योगिक तंत्रज्ञान (इंडस्ट्रीयल इंजिनिअरींग)मध्ये डॉक्टरेट (पीएच.डी.) मिळवली असल्याने वितरण, विक्री आणि व्यूहरचना (लॉजिस्टीक्स) विभागाची कु. सायली ही एक घटक होती. १००० मुलांना एकाचवेळी विना अडचण प्रशिक्षित करून एक जागतिक व भारतीय विक्रम केला ज्याची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डसूमध्ये नोंद झाली हे विशेष. सायलीच्या ह्या कौशल्याबद्दल आणि भिडे कुटुंबाची यशाची पताका जगामध्ये नेली ह्याबद्दल नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान व भिडे मंडळींकडून हार्दिक अभिनंदन. भविष्यात असेच यश मिळो ही सदिच्छा ! सायली ही बोरिवली येथील श्री. चंद्रशेखर भिडे यांची कन्या आहे.

## अभिनंदन !



लेखिका व कवियित्री डॉ.सौ. प्रतिभा भिडे, ठाणे यांना अमरावती येथे संस्कृती, साहित्य, संगीत व निसर्ग पर्यटन महासंमेलनात हिरकणी पुरस्कार प्राप्त झाला त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन ! डॉ. प्रतिभाताई यांचे काव्यसंग्रह, नाटके, अनेक लेख संग्रह व त्यांची पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. ह्यापूर्वी कविवर्य मंगेश पाडगांवकर यांनी ‘विभ्रम’ ह्या काव्य-संग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यात कवियित्री डॉ. प्रतिभाताईंचे मनापासून कौतुक केले होते ही बाब विशेष आहे. पुन्हा एकदा त्यांचे अभिनंदन !

**दातृत्व : सांगली संमेलनामध्ये भिडे कलाकारांना भेटवस्तू देण्यात आल्या. त्याचे प्रायोजकत्व श्रीमती शशीताई घुले, पुणे ह्यांनी स्वीकारुन ४,१०० रुपयांचा आर्थिक हातभार लावला. त्यासाठी नित्युंदय गोत्रीय भिडे प्रतिष्ठान आभारी आहे.**

लेखन स्पर्धा -
उत्तेजनार्थ पारितोषिक

# छंदिष्ट खवैय्या

ले. कर्नल (नि.) सुनील भिडे, पुणे
मो. ९६२३०१७४४४



खाणं आणि पिणं हा माणसाचा निसर्गदत्त स्वभाव आहे. काही माणसे जगण्यासाठी खातात तर काही खाण्यासाठी जगतात. खाण्यासाठी जगणाऱ्या खवैय्यांच्या काही विशिष्ट सवयी असतात. खवैय्या जर मिस्किल स्वभावाचा असेल तर त्याला एकट्याने खाण्याचा किंवा पिण्याचा आनंद मिळणार नाही. सगळ्यांसोबत विशेषतः मित्रांसोबत रंगत अधिक रंगते. पोटभर खाण्याबरोबर मोटभर आनंद कसा उपभोगता येईल याचा त्याला छंद असतो. अशा छंदिष्ट खवैय्यांची अर्थात माझ्या मित्राची आठवण मी सांगणार आहे. तो काळ मल्टी चॅनेल टी.व्ही. किंवा सेलफोनचा नव्हता. पार्टी म्हटले की पिझ्झा, बर्गर मागविण्याचा नव्हता. खवैय्येगिरी करण्यासाठी त्यांनी शोधलेल्या युक्त्याप्रयुक्त्या ऐकून तुम्हीपण अवाक व्हाल.

उन्हाळ्याच्या सुट्टीत मी आणि माझा मित्र पोहायला जात असू. मनसोक्त पोहून झाल्यावर भुकेचा आग्याडोंब उसळायचा. केव्हा जेवणावर ताव मारतो असे व्हायचे. खरं तर आमच्या दोघांच्याही घरची स्थिती बेताची म्हणजे त्याच्याकडे एकादशी तर माझ्याकडे शिवरात्र. असे असूनही माझ्या आईचा स्वभाव 'वसुधैव कुटुंबकम्' मानण्यातला असल्यामुळे बऱ्याचदा माझ्यासोबत मित्राचे जेवण, नाष्टा आमच्या घरी व्हायचा. आमचा उल्लेख ती जोडगोळी असा करायची. दुपारभर झाडावर चढून जांभळे, आंबे, पेरू खाण्याचा (बिनपैशात पोटभर) प्रोग्रॅम व्हायचा. दिवसाचा प्रोग्रॅम झाल्यावर रात्रीचे काय ? पत्ते कॅरम, चेस रोजचेच. पण पोटोबांचे काय ? रिकामं पोट आणि रिकामं डोकं काय करायला लावील सांगता येत नाही. त्याच्या डोक्यात एक युक्ती आली. तो मला म्हणाला यार उद्या मी तुला पार्टी देणार म्हणजे देणार. अगदी शंभर टक्के.

मला जरा नवलच वाटलं. त्याचं असं झालं ... माझ्या मित्राचा जुना पण प्रशस्त वाडा होता.आमच्या पेठेतील एका समाजसेविकेने तेथे बालवाडी चालविण्याचा प्रस्ताव मांडला. काही निवडक मंडळींची बैठक ठरली. अध्यक्ष म्हणून मान्यवर शिक्षण संस्थेचे अधिकारी येणार होते. त्यांच्या चहा-फराळाची व्यवस्था अर्थात माझ्या मित्रावर सोपविली होती. त्याला ह्या चर्चेत अजिबात रस नव्हता. त्याचे सारे लक्ष फराळाच्या जिनसांवर होते. एकदाची मिटींग संपली त्यासरशी जोरदार शीळ मारून त्याने मला आणि मित्रमंडळींना साद घातली. मग आम्ही मित्रमंडळींनी पोटभर फराळ व मोटभर आनंद उपभोगला. अशी आमची अविस्मरणीय खवैय्येगिरी ! हे तर काहीच नाही. एक किस्सा तर फारच गमतीचा आहे.

एके दिवशी आम्ही गप्पा मारत बसलो असताना त्याच्या डोक्यात एक युक्ती आली. 'आज रात्री पिक्चरला जाऊ' असा प्रस्ताव त्याने मांडला. दोघांकडे पैशाची कडकी. तो मला म्हणाला, थांब आमच्या किराणा दुकानात जाऊन येतो. दुकानदाराला दोन किलो शेंगदाण्याची उधारी खात्यात लिहिण्यास सांगितली आणि स्पष्ट शब्दांत सांगितले, मला शेंगदाणे नकोत रोख पैसे हवे आहेत. दुकानदार नेहमीचा ओळखीचा. त्याला वाटले पोरगं अडचणीत दिसतेय म्हणून परत बोलीने त्याने मित्राच्या हातावर पैसे टिकवले. पैसे हाती पडताच स्वारी खूष. मला जोरदार टाळी देत, शीळ घालत रात्रीचा पिक्चर पाहण्याचा प्रोग्रॅम झाला. पिक्चर पाहताना वडापाव खाऊन झाला होता पण पोटोबा शांत झाला नव्हता. परत येताना रस्त्याने चालता चालता गुऱ्हाळ लागले. रस पिण्याची तीव्र इच्छा झाली. खिशातील चिल्लर स्वस्थ राहू देईना. गुऱ्हाळात जाऊन पोटभर रस प्यायला. रात्रीची साडेबाराची वेळ. गुऱ्हाळवाला गुऱ्हाळ बंद करून घरी जायच्या तयारीत होता. उरलेला रस फ्रिजमध्ये ठेवण्याची सोय नसल्यामुळे म्हणा किंवा अतिउन्हाळ्याने रस आंबून जाईल म्हणून म्हणा रस अक्षरशः गटारीत ओतून टाकायच्या तयारीत होता. गुऱ्हाळवाल्याची ती अवस्था पाहून माझ्या मित्राच्या डोक्यात युक्तीचा किडा वळवळायला लागला. न राहवून तो एकदम ओरडून म्हणाला, 'ओऽ राव, असा रस ओतून देत जाऊ नका. उद्या याच वेळी येईन म्हणजे माझे पैसे वाचतील, पोटभर रस प्यायला मिळेल ह्यापेक्षा मुख्य म्हणजे तुमची चिंता मिटेल.'

एकदा एका शेतात उसाची कापणी चालू होती. ट्रॅक्टरमध्ये ऊस भरून साखर कारखान्यात रवाना होणार होता. ह्या छंदिष्टाची नजर उसावर गेली. ट्रॅक्टरवाल्याला ह्या खवैय्याने उसाची मागणी केली. ट्रॅक्टरवाला म्हणाला, बाबा रे, ऊस माझा नाही. नाहीतर दिला असता. मालक रागावतील. त्यावर हा दोस्त म्हणतो कसा, ऊस तुमचा नाही मग तर चिंताच नाही. मग तर ऊस द्याच. आणि त्याने हो नाही म्हणायची वाट न बघता २-४ ऊस घेऊन स्वारी पळाली. मित्रांसोबत गप्पांची रंगत उसाच्या रसाइतकीच रंगली अन् हास्यरसानी फेसाळली सुद्धा ! आहे किनई गंमत खवैय्येगिरीची !

## पनवेल G2G - 2020

कळविण्यास आनंद होतो की, सांगली संमेलनाची सांगता होताना पुढील वर्षाचे संमेलन नियोजनाबाबत विचार करण्यास सुरुवात होतानाच डोंबिवलीचे श्री. मंदार भिडे आणि पनवेलचे श्री. मंदार (अनिरुद्ध) भिडे यांनी पुढील वर्षी संमेलन पनवेल येथे घेऊ या आणि आम्ही सर्व मंडळी त्याच्या नियोजनासाठी कसोशीने प्रयत्न करू असे आत्मविश्वासाने सांगितले, त्यामुळे पुढील संमेलन पनवेल येथे होणार हे निश्चित झाले आहे. त्यानंतर पनवेल येथे स्थानिक भिडे मंडळींनी एकत्र येऊन एक बैठकसुद्धा घेतली. त्या बैठकीला सौ. मोहिनी, मधुरा, योगिता व अश्विनी भिडे यांचे बरोबर सौ. संपदा व श्री. राजेंद्र भिडे उपस्थित होते. त्याच बैठकीत पनवेल स्थानिक भिडे मंडळींकडून संमेलन पनवेलला घेऊ असे फक्त आश्वासन न देता लेखी पत्रसुद्धा कार्यकारिणी/विश्वस्तांना दिले आहे. संमेलन स्थळ शक्यतो नवीन असावे हा मानस असतो. अलिबागजवळ किहीम येथे संमेलन झाले आहे. पनवेल म्हणजे मुंबई, कोकण आणि इतर भागाला तसेच लांबपल्ल्याच्या रेल्वे व बसने सहजगत्या येण्यासारखे असे ठिकाण आहे. त्यादृष्टीने मोठ्या संख्येने उपस्थिती राहील असा विश्वास वाटतो. *– दिलीप भिडे, सचिव, विश्वस्त*

# अंक परत येणारे पत्ते....

गेल्या वर्षात सुमारे ५० पेक्षा जास्त 'आम्ही भिडे' अंक बदललेला पत्ता, किंवा अन्य कारणाने परत येत आहेत. आमच्याकडे परत आलेल्या अंकाचे पुनर्वितरण केले जाणार नाही. परंतु आपल्या माहितीकरिता खाली दिलेल्या यादीनुसार खालील व्यक्तींनी आपला नवीन अथवा बदललेला पत्ता आम्हाला लेखी पत्राने किंवा एस.एम.एस. करून खालील मोबाईलवर कळविल्यास पुढील अंकाचे वितरण आलेल्या पत्त्यानुसार केले जाईल, ह्याची कृपया नोंद घ्यावी.

**दिलीप भिडे (पुणे),९६५७५४१२३६ ले.क. सुनिल भिडे (पुणे),९६२३०१७४४४**
**प्रदीप भिडे (डोंबिवली), ९८९२५०४०४२ सौ. संपदा भिडे (दादर), ९८१९९५१३९१**

---

**श्री. श्रीराम शंकर भिडे**
फ्लॅट नं. ३, शेट्ये कॉम्प्लेक्स,
रेल्वेलाईन, सोलापूर.

**सौ. कला पराडकर**
८२, मांगल्य बंगला, सिद्धेश्वर पेठ,
सोलापूर

**श्री. रामकृष्ण दत्तात्रय भिडे**
एच. नं. ३९/ए, डी.व्ही. रोड,
पणजी, गोवा.

**श्री. दिलीप व्ही. भिडे**
ऋतुजा अपार्टमेंट, पांडे ले-आऊट
प्लॉट नं. १२३, नागपूर.

**श्री. दिनेश लक्ष्मण भिडे**
कोरलाई फोर्ट, लाईट हाऊस,
पोस्ट कोर्लाई, रायगड

**सौ. किर्ती आर. भाटे (भिडे)**
सी/५, जयमाता सोसायटी,
सहस्त्रबुद्धे हॉस्पिटल शेजारी, नित्यानंद मार्ग,
पनवेल, रायगड.

**श्री. सदाशिव वासुदेव भिडे**
१३, तपोभूमी सहकारी गृहरचना संस्था,
दत्तवाडी, पुणे - ४११ ०३०.

**श्रीमती शैलजा चंद्रकांत भिडे**
६२४, नारायण पेठ, लोखंडे तालमी जवळ,
पुणे - ४११ ०३०.

**श्री. सदाशिव एम. भिडे**
४१७, शनिवार पेठ, साठे ब्लॉक्स,
रूम नं. ११, गाडगीळ घरासमोर,
पुणे-४११ ०३०.

**श्री. एस. जे. भिडे**
विवेकानंद सोसायटी, सिंहगड रोड,
पुणे-४११ ०३०

**श्री. मोरेश्वर भालचंद्र भिडे**
८५५, सदाशिव पेठ, जोंधळे चौक,
लिमये वाडा, पुणे - ४११ ०३०

**श्री. पद्माकर जी. भिडे**
११-ए/७, एरंडवणे, पुणे ४११ ००४.

**सौ. माधुरी विनायक भिडे**
बी/३, तळमजला, भगवंत कृपा, होलीक्रॉस
शाळेचे मागे, कल्याण, ठाणे - ४२१ ३०१.

**श्री. मोहन त्रिंबक भिडे**
७२२४, न्यू शिवनेरी दर्शन हौ. सोसायटी,
ठाणकर पाडा, आग्रा रोड, कल्याण,
ठाणे - ४२१ ३०१.

**श्री. गजानन सदाशिव भिडे**
७०५९, ५, सांगाती, स्वानंद नगर,
काळा तलाव, कल्याण (पश्चिम),
ठाणे - ४२१ ३१०.

**श्री. माधव गणेश भिडे**
एस. डी. कॉर्पोरेशन ट्रस्टी कॅरिअर,
ठाकूर कॉलेज समोर, ठाकूर व्हिलेज,
कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

**श्री. नरहर रामचंद्र भिडे**
४, लोकमंगल सोसायटी, परांजपे बी स्कीम,
रोड नं. ४, विलेपार्ले (पूर्व),
मुंबई - ४०० ०५७.

**डॉ. पी. जी. भिडे**
१-ई, शकुंतला सोसायटी, पेस्टमनगर,
चेंबूर, मुंबई - ४०० ०८१.

## ब्रह्मकमळ

पाना-फुलांत रमण्याचा छंद मजला
हरखुनी गेले पाहुनी या पानफुटीला
एक, दोन, तीन, चार चक्क सातजणी
राजहंसी कळ्या होत्या पानागणी
दिन ढळला रिमझिमत्या शितल सांजेला
राजसकळ्या लागल्या चोची उघडायला
आषाढमेघांच्या अमृतसरी प्राशण्याला
का बारमाहीची क्षुधा क्षमवायाला
सरीवर सरी बरसल्या
आंगोपांगी कळ्या मोहरल्या
पाहण्या निसर्गाची कस्तुरी किमया
साऱ्यांच्या नजरा ब्रह्मकमळावरी एकवटल्या
उमलणे आणि मिटणे सोहळा काही तासांचा
अल्पायुषी आठवणी चिरंतन करण्याचा
शापच असतो का सौंदर्याला क्षणभंगुरतेचा
का वरच म्हणावा तृप्तीतच डोळे मिटण्याचा

**- सौ. जयश्री भिडे, पुणे.**

---

## गणेशस्तवन

गणपती बाप्पा मोरया
उंदरावकनी लवकर या॥
आभाळ रस्ता छान तुम्हाला
काटा तेथे असेल कुठला
उगाच करता उशीर आपुला
आम्ही थांबलो भेटाया॥
कमळ, केवडा, शमी, दूर्वांकूर
पत्री, फुले, मंदारही सुंदर
सुगंध दरवळ तव पूजेला
प्रसन्न वदने अर्पूया॥
मोदक, लाडू नैवेद्याला
ताट चांदीचे भोजन करण्या
फुल्या चांदीच्या चौरंगाला
उजळती चांदीच्या समया॥
सखी शारदा विणा छेडिते
सूरमय आमुचे जीवन करीते
ज्ञान दर्पणी आम्हा दाविते
सुंदर छबी तव सुख तनया

**- श्रीमती शशी घुले (भिडे), पुणे.**
मो. ९३२५५२५९११

**मुंबई कार्यालय : सौ. संपदा भिडे**
ए ५०३, श्रीसाई शारदा हौसिंग सोसायटी,
भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम),
मुंबई - ४०० ०२८.
मो. ९८१९९ ५१३९१

**• पत्रव्यवहारासाठी पत्ता •**
**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**
१४२६, सदाशिव पेठ, निलसदन, ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०.
मो. ९६२३०१७४४४

'प्राजक्त' हे पत्र मुद्रक सौ. विनीता प्रफुल्ल डबीर यांनी प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांचेसाठी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६०१२ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले. संपादक : प्रफुल्ल डबीर
RNI No. : M-6 (1457)/70-RNI
**Reg. No. KLR 136/18-20 Posted in Kolhapur RMS**

साप्ताहिक **प्राजक्त**
२८७, 'डी' वॉर्ड, कसबा गेट
गंगावेस रोड, कोल्हापूर.
फोन नं. ०२३१-२५४०४२७

## भिडे प्रतिष्ठानच्या महिला समिती संस्थापक श्रीमती शशिताई घुले-भिडे यांनी सांगली संमेलनात व्यक्त केलेले मनोगत

भिडे प्रतिष्ठानच्या घटनेचा आधार घेऊन, प्रतिष्ठान अधिकाधिक उंचीवर नेण्यासाठी भिड्यांच्या भगिनी आणि माहेरवाशिणींच्या शक्तीचा व बुद्धीचा वापर व्हावा ह्यासाठी २०११ च्या मुंडाजे (कर्नाटक) येथे झालेल्या भिडे संमेलनामध्ये महिलांना प्राधान्य मिळावे ह्यासाठी सूतोवाच केले. भिडे कुलबंधूंबरोबर भगिनी व माहेरवाशिणींची सुद्धा वर्णी लागावी ह्यासाठी मी सतत प्रयत्नशील राहिले. ह्यासाठी प्रथमच २०१३-१४, डोंबिवली येथे झालेल्या कुलसंमेलनापासून सर्वप्रथम महिला समितीची स्थापना केली. प्रथम त्यामध्ये फक्त पाचच महिलांचा समावेश केला. त्यामध्ये मी स्वतः शशीताई घुले, सौ. संपदा, दादर, ॲड. अलका भिडे, कल्याण, सौ. प्रिया भिडे, पुणे आणि पूर्वा देवधर, मुंबई ह्यांपैकी पूर्वा देवधर (भिडे) व सौ. प्रिया भिडे, पुणे ह्या समितीतून बाहेर पडल्या आणि महिला समितीमध्ये संख्याबळ कमी असल्यामुळे महिला समितीच्या संख्येमध्ये ११ पर्यंत वृद्धी करण्यात आली. ही समिती दरवर्षी होणाऱ्या भिडे कुल संमेलनात जाहीर केली जाते.

संसार सांभाळताना महिला कोणत्याही सार्वजनिक कार्यामध्ये स्वतः झोकून देत नाहीत. त्यामुळे त्यांच्या बाबतीत माझ्या भिडे बंधूंना बोलायला कारण मिळते. मात्र त्यांना संधी दिलीत तर त्या प्रत्येक कामामध्ये आपली चोख कामगिरी करू शकतात हे सौ. संपदा, मुंबई हिने प्रतिष्ठानच्या १३ वर्षांचे प्रलंबित कामे म्हणजे ऑडिट रिपोर्ट एकावेळेस कोणताही दंड न भरता दाखल केले आणि घटना दुरुस्तीसाठी अथक प्रयत्न करून आजमितीला घटना दुरुस्ती झाली. म्हणजेच पुरुषांच्या म्हणजे माझ्या भिडे बंधूंच्या बरोबरीने हे काम करू शकतो हे ह्या महिलांनी दाखवून दिले ह्याचा मला अभिमान वाटतो. भिड्यांनी, भिड्यांसाठी एकत्र येऊन एकमेकाला साह्य करण्यासाठी हे प्रतिष्ठान आहे आणि त्या प्रतिष्ठानला कोणत्याही प्रकारे आर्थिक तोशिष न देता, अधिकाधिक उंचीवर नेणे हे मी माझे उत्तरदायित्व समजते. भिडे प्रतिष्ठानच्या महिलांचे हळदीकुंकू व भोंडला हे पारंपरिक कार्यक्रम करण्याबरोबरच भिडे कुटुंबीयांची माहिती घेऊन प्रत्येक भिडे कुटुंबामध्ये प्रतिष्ठानचे सभासद झालेले आहेत की नाही हे पाहून त्यांना सभासद होण्यामागचे उद्देश पटवून दिले पाहिजेत तसेच संमेलन अथवा प्रतिष्ठान आयोजित कार्यक्रमामध्ये भोजन कक्षाकडे लक्ष देऊन आपल्या भिडे कुटुंबीयांची स्वच्छता व आरोग्य कसे उत्तम राहील ह्याला प्राधान्य दिले पाहिजे. संमेलनास येणाऱ्या कुटुंबीयांनी विशेषतः महिलांनी किमान १०० रुपये देणगी प्रतिष्ठानला देण्याचे महत्त्व सांगायला पाहिजे. म्हणजेच प्रतिष्ठानच्या निधीमध्ये वृद्धी होईल.

संमेलनामध्ये सहभागी होण्यासाठी आपल्या भिडे कुटुंबीयांमध्ये संमेलन वर्गणी व जाण्या-येण्याचा खर्च काहींना परवडण्यासारखा नसतो. त्याकरिता आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेले जे भिडे कुटुंबीय काही अन्य कारणामुळे उपस्थित राहू शकत नाहीत अशांनी आपली खर्च होणारी रक्कम देणगी म्हणून प्रतिष्ठानकडे पाठविल्यास अशा मिळालेल्या देणगीचा उपयोग आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या म्हणून संमेलनाला उपस्थित न राहता येणाऱ्यांना काही प्रमाणात सवलत देऊन त्यांनाही सहभागी करून घेता येईल. लोकमान्य टिळकांच्या पैसाफंड कारखान्याचे उदाहरण आपणास माहीतच आहे. आजमितीला भिडे कुटुंबीयांनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे. अशा तऱ्हेचे उपक्रम राबविले तर त्याचा उपयोग संपूर्ण भिडे ज्ञातीला होईल. प्रतिष्ठानमध्ये आईचा, सुनेचा, उद्योजकाचा सन्मान केला जातो म्हणून भिडे माहेरवाशिणींचा सुद्धा सन्मान व्हावा ह्या हेतूने भिडे संमेलनामध्ये किमान दोन भगिनींचा सन्मान व्हावा म्हणून २ वर्षांपूर्वी भिडे प्रतिष्ठानकडे ५०,००० रुपये देणगी देऊन त्याच्या मिळणाऱ्या व्याजातून हा सन्मान केला जावा ह्या उदात्त हेतूने 'माहेरचा मान' हा पुरस्कार सुरू केला.

माहेरवाशिणींचा सन्मान करताना दोन माहेरवाशिणींचा सन्मान होणे आवश्यक आहेच. अनेकांना साह्य करण्याचा मला आनंद होतो. आपल्याला जे मिळते आणि शक्य आहे ते करण्यासाठी मला उत्साह असतो. भिडे कुटुंबातील अनेक महिलांना हा सन्मान दरवर्षी मिळावा ही इच्छा आहे. ह्या विशाल हेतूने गेले दोन वर्षे मी स्वतःच्या खर्चाने म्हणजेच प्रतिष्ठानला कोणतीही आर्थिक तोशिष न देता नवीन साड्या खरेदी करून माझ्या भिडे भगिनींना देण्याचा प्रयत्न करते आहे. जास्तीत जास्त भिडे महिलांनी संमेलनात सहभागी व्हावे. भिडे प्रतिष्ठानला आर्थिक, मानसिक आणि सामाजिक लौकिक मिळवून द्यावा ह्या दृष्टीने भिडे भगिनींचा सन्मान म्हणून हे धाडसी पाऊल उचलले आहे. भिडे प्रतिष्ठानकडून अथवा व्यासपीठावरून भगिनींना साड्या दिल्या जातात त्याबाबत गैरसमज निर्माण होऊ नयेत ह्याच हेतूने हा मुद्दा मांडला आहे. माझे हे कार्य भगिनी, बंधू, माहेरवाशिणी, वहिनी व कुटुंबीय या सर्वांनी उत्तम रितीने प्रगतीपथावर नेऊन भिडे प्रतिष्ठानला जगाच्या स्मरणात आणावे ही मनापासून सदिच्छा आणि विनंती आहे. भिड्यांनी, भिड्यांसाठी एकत्र येऊन एकमेकाला मदत आणि हे प्रतिष्ठानचे पारदर्शक कार्य अखंड सुरू राहण्यासाठी मी शशीताई घुले अखेरच्या श्वासापर्यंत प्रयत्न करेन हे आश्वासन देऊन मी इथे थांबते.

- श्रीमती शशीताई घुले (भिडे), पुणे.